दै. गोदातीर

# जाळ्यात ओढून अश्लील क्लिप बनवली, नंतर धमकी देऊन खंडणीची मागणी; दोन महिलांसह पाच जणांना अटक

## भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**नांदेड-** एका युवकाला जाळ्यात ओढून अश्लील क्लिप तयार करून नंतर ही क्लिप वायरल करण्याची धमकी धमकी देऊन खंडणीची मागणी करण्यात आल्याचा प्रकार नांदेडमध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन महिलांसह पाच जणांना अटक केली असून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भोकर येथील युवकाला प्रेमाचा जांळ्यात ओढून आपल्या घरी बोलावून त्याचे एका महिलेसोबत अश्लील चित्रीकरण करण्यात आले. त्यानंतर दीड लाख रुपये खंडणी मागून त्यापैकी ४० हजार रुपये स्वीकारणाऱ्या दोन महिलांसह इतर तिघांविरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहेत. त्यांची पोलिसांकडून कसून चौकशी सुरू असून लवकरच स्थागुशाचे पथक त्यांना भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात देणार आहेत.

भोकर येथील चिखलवाडी भागात राहणारा अथर्व विलास डुबेवार (वय २१) हा १३ जानेवारी २०२४ रोजी भोकरच्या बाजारपेठेमध्ये खरेदीसाठी गेला होता. यावेळी बाजारामध्ये त्याला नीता नावाची एक महिला भेटली. तिने त्याच्यासोबत संवाद करून माझा फोन घरी राहिला आहे, तुमचा फोन वापरण्यासाठी देता का असे म्हणून अथर्व डुब्बेवार याचा फोन घेऊन तिने अथर्वच्या मोबाईलवरून तिच्या मोबाईल क्रमांकावर कॉल केला आणि त्यानंतर त्याचा फोन परत केला.

त्यानंतर ११ फेब्रुवारी रोजी अथर्व याला फोन करून मी नीता बोलते असा संवाद साधत तू नांदेडला आल्यानंतर मला कॉल कर, आपण भेटूया, माझे तुझ्याशी काम आहे असे सांगितले. यानंतर १२ फब्रुवारी रोजी अथर्व डुब्बेवार हा नांदेडला आला. यावेळी त्याने नीता नावाच्या या महिलेला फोन लावला. तिने प्रकाशनगर कॅनॉल रोड येथे बोलावले. घरी घेऊन गेल्यानंतर एका रूममध्ये बसविले त्यानंतर दुसऱ्या

(पान ५ वर...

दै. प्रजावाणी

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कुंडलवाडी पोलिसांचे पथसंचलन



कुंडलवाडी, (वार्ताहर) दि. ११ : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहर व परिसरात कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कुंडलवाडी पोलिसांनी शहरातील विविध मार्गावर आज सोमवारी दि.११ मार्च रोजी पथसंचलन केले.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, धर्माबादचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत संपत्ते यांच्या मार्गदर्शनाखाली कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोजहस निरीक्षक संतोष ... उपनिरीक्षक ... आज सोमवारी शहरातील विविध भागातून पथसंचलन करण्यात आले आहे. या पथसंचलनात कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी पोहेकॉ पी.आर.मेडेवार, इद्रीस बेग, नजीर शेख, रघुवीरसिंह चौहाण, सुदर्शन कमलाकर, संजय चापलवार, गणपत गंधकवाड, सुनील बास्टेवाड यांच्यासह महिला पोलीस कर्मचारी व गृहरक्षक दलाचे जवान, सीआरपीएफचे जवान सहभागी झाले होते.

